रविकांत साखरे, जामखेड.

☐ **संजीवकुमारच्या *आयेगा आनेवाला, अग्निरेखा, कंगन, रुसवाई, मांग सजा दो मेरी, सावन के गीत, धोती लोटा और चौपाटी, रॉकी मेरा नाम* या चित्रपटांचे दिग्दर्शक कोण? नायिका कोण? हे चित्रपट केव्हा प्रदर्शित झाले होते?**

— *आयेगा आनेवाला* १९६७, दिग्दर्शक केवल मिश्रा, नायिका कुमकुम.

अग्निरेखा १९७४, दिग्दर्शक महेश कौल, नायिका शारदा.

कंगन १९७१, दिग्दर्शक के.बी.तिलक, नायिका माला सिन्हा.

रुसवाई नावाचा चित्रपट सुरू झाला होता. पण तो पूर्ण होऊन पडद्यावर आला नाही. *मांग सजा दो मेरी* १९८८, या चित्रपटात संजीवकुमार चरित्र अभिनेता होता. दिग्दर्शक कोण याची माहिती उपलब्ध नाही.

सावन के गीत १९७८, दिग्दर्शक आर. भट्टाचार्य, नायिका रेखा.

धोती लोटा और चौपाटी १९७५, दिग्दर्शक मोहन चोटी. संजीवकुमार या चित्रपटात पाहुणा कलाकार होता.

रॉकी मेरा नाम १९७३, दिग्दर्शक सतराम रोहरा, नायिका तनुजा.

☐ **दीप्ती नवलचे सर्वोत्कृष्ट चित्रपट कोणते? तिला फिल्मफेअर ॲवार्ड मिळालाय का?**

— *एक बार फिर, जुनून, दामुल, हिप हिप हुर्रे, मिर्च मसाला, पंचवटी, कमला, सूर्योदय* हे दीप्तीचे सर्वश्रेष्ठ चित्रपट. तिला फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालेला नाही.

मंदार आर. साळुंके, कांजुरमार्ग.

☐ **शेखरने कोणकोणत्या नायिकांबरोबर भूमिका केली?**

— नलिनी जयवंत (*आँखे*), सुलोचना चटर्जी (*बहुरानी*), नूतन (*हमारी बेटी, आखरी डाव*), रेहाना (*अदा*), निम्मी (*सब्जबाग, शिकार, हमदर्द, छोटे बाबू*), रागिनी (*चमकी*), कामिनी कौशल (*आस, आसू, बँक मॅनेजर*), गीताबाली (*नया घर*), श्यामा (*दरवाजा*), पूर्णिमा (*टुटे खिलौने*), सुलोचना (*बिंदिया*), अमिता (*अभिमान*), सईदा खान (*हम मतवाले नवजवान*), माला सिन्हा (*आँख मिचौली*) या नायिकांबरोबर शेखर नायकाच्या भूमिकेत चमकला.


अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

☐ **आजवर कोणकोणत्या क्रांतिकारकांच्या जीवनावर चित्रपट निर्माण झाले आहेत? प्रमुख कलाकार व दिग्दर्शक कोण?**

— *उमाजी नाईक* (१९३८), कलाकार-केशवराव दाते, मधुकर गुप्ते, शंकरराव भोसले, कमलाबाई बडोदेकर, शंकरराव भोसले, दिग्दर्शक-गजानन जागीरदार.

जय विजय कोळी, वरेडी कोळीवाडा.

☐ **सिलसिलातील 'रंग बरसे भीगे...' या गाण्याचा गायक कोण?**



सिलसिलामध्ये नायक-गायक अमिताभ बच्चन रेखासह

— *सिलसिलातील* 'रंग बरसे भीगे...' या गाण्याचा गायक होता अभिनेता अमिताभ बच्चन.

उमाजी नाईक (१९६०) कलाकार-गजानन जागीरदार, नानासाहेब फाटक, लीला चिटणीस, मदनमोहन, प्रभाकर मुजुमदार, रंजना, नलिनी डेरे, दिग्दर्शक-गजानन जागीरदार.

सावळ्या तांडेल (१९४२) कलाकार बी. नांद्रेकर, कमलाबाई मंगळूरकर, गंगूबाई. दिग्दर्शक मधुकर बावडेकर.

क्रांतिवीर वासुदेव बळवंत (१९५०) कलाकार-विश्वास कुंटे, सुमती गुप्ते, बाबूराव पेंढारकर, उषाकिरण, चिंतामणराव कोल्हटकर, दिग्दर्शक-विश्राम बेडेकर.

फकिरा (१९६३) कलाकार-सूर्यकांत, सुलोचना, नाना पळशीकर, जयराज, डेव्हीड, दिग्दर्शक-कुमार चंद्रशेखर.

वारणेचा वाघ (१९७०) कलाकार-सूर्यकांत, सुशीला, राजशेखर, बर्ची बहाद्दर, दिग्दर्शक-वसंत पेंटर.

२२ जून १८९७ (१९७९) कलाकार-रवींद्र मंकणी, प्रभाकर पाटणकर, सदाशिव अमरापूरकर, शांता जोग, अरुंधती राव, दीपाली कुलकर्णी. दिग्दर्शक-नचिकेत-जयू. भगतसिंगच्या जीवनावरील *द लिजंड ऑफ भगतसिंग* (दिग्दर्शक-राजकुमार संतोषी, नायक अजय देवगण) आणि *२३ जून १९३१: शहीद* (दिग्दर्शक गुड्डू धनोआ, नायक बॉबी देओल) हे दोन चित्रपट अलीकडेच पडद्यावर आले आहेत. यापूर्वी भगतसिंगवरील तीन चित्रपट येऊन गेले आहेत.

शहीद-ए-आजम भगतसिंग (१९५४) कलाकारः प्रेम अदीब, जयराज, स्मृती विश्वास, जॉनी वॉकर, अमीरबाई कर्नाटकी, दिग्दर्शक-जगदीश गौतम.

शहीद भगतसिंग (१९६३) कलाकार-शम्मी कपूर, शकीला, प्रेमनाथ, उल्हास, सप्रू, अचला सचदेव. हा चित्रपट सुरू झाला तेव्हा विश्राम बेडेकर या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. पण नंतर के.एन. बन्सलनी तो पूर्ण करून पडद्यावर आणला.

शहीद (१९६५) कलाकार-मनोजकुमार, सरिता, प्रेम चोप्रा, प्राण, कामिनी कौशल, निरूपा रॉय, मनमोहन, इंद्राणी मुखर्जी, मदनपुरी, सप्रू.

चंद्रशेखर आजाद (१९६३) कलाकार-जयराज, निरूपा रॉय, इंदिरा, लीला मिश्रा, मजनू, दिग्दर्शक-जगदीश गौतम.

सुभाषचंद्र (१९७८) या चित्रपटाची बाकीची माहिती उपलब्ध नाही.

नेताजी सुभाषचंद्र बोस (१९६६) कलाकार-अभी भट्टाचार्य, जयमाला, बिपिन गुप्ता, उल्हास, पद्मादेवी, दिग्दर्शक हेमन गुप्ता.

गांधीजी (१९४८) हा चित्रपट एक अनुबोधपट होता. तो पटेल इंडिया हिने निर्माण केला होता.

गांधी (१९८३) कलाकार-बेन किंगज्ले, रोहिणी हट्टंगडी, सईद जाफरी, अमरीश पुरी, दिग्दर्शक-आर. अदोनबर्ग.

सरदार (१९९४) कलाकार-परेश रावल, बेंजामिन गिलानी, अन्नू कपूर, टॉम आल्टर, श्रावणी व्यास, दिग्दर्शक-केतन मेहता.

जय विजय कोळी, वरेडी कोळीवाडा.

☐ **'आँखो ही आँखो में इशारा हो गया...' हे गाणे कोणत्या चित्रपटातील?**

— रफी व गीता दत्त यांनी गायलेलं हे गाणं गुरुदत्त यांच्या *सी.आय.डी.* या चित्रपटातील.